# वसई-विरार शहर महानगरपालिका e-वार्ता

वर्ष पहिले-जुलै २०१५


## महापालिकेची बोळींज अपंग विद्यार्थीशाळेसाठी शालेय बसफेरी सुरु.

बोळींज येथील स्वामी परिज्ञानाश्रम शैक्षणिक व व्यवसायीक केंद्र, अपंगाच्या शाळेत आमदार क्षितीज ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधून महापौर प्रविणा हितेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत आमदार क्षितीज ठाकूर यांच्या शुभहस्ते विशेष बालकांना शाळेत जाण्या येण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या मार्गाचा शुभारंभ करण्यात आला.

वसई तालुक्यातील सुमारे 300 मतीमंद,गतीमंद व अपंग बालकांचे शैक्षणिक आणि व्यवसायीक विकास या केंद्रातून केला जातो.या केंद्रात विद्यार्थ्यांना जाण्या-येण्यासाठी एस.टी महामंडळाची बस सेवा होती परंतू महानगरपालिकेची शहरानांतर्गत परिवहन सेवा सुरु झाल्यानंतर एस.टी ने सदर सेवा खंडीत केल्या कारणाने या 300 विद्यार्थ्यांनी शाळेत येणेच बंद केले होते. या बाबत शाळेचे संचालक डॉ.मणकेकर, दत्तात्रेय नाईक यांनी आणि प्राचार्य कल्याणपुरे यांनी विद्यार्थ्यांची दुरावस्था लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याकडे कैफियत मांडली होती. विशेष बालकांना होणा-या या गैरसोयीची दखल गांभीर्याने घेत लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आमदार क्षितीज ठाकूर यांना निर्देश देवून या प्रश्नावर तातडीने उपायोजना करण्यास सांगितल्याने सदर बाबतीत परिवहन सेवा चालविणारे भागिरथी ट्रान्स कॉर्पोचे मालक मनोहर सकपाळ यांना कळविल्यावर त्यांनाही या हमखास तोट्यात चालणा-या मार्गासाठी बससेवा माणुसकीच्या नात्याने तातडीने सुरु करण्यासाठी अनुमती दर्शवून शाळेच्या आवारातून परिवहन सेवा सुरु करण्यात आली.

या बसेस सकाळी 8.45 वा. वसई पश्चिम येथून सुटून पापडी-वसई गाव-होळी- भुईगाव-निर्मळ -चक्रेश्वर तलाव-बोळींज मार्गे बोळींज येथील स्वामी परिज्ञानाश्रम शैक्षणिक व व्यवसायीक केंद्र, अपंगाच्या शाळेत येणार आहे. तर सकाळी.9.00 नालासोपारा आचोळे तलाव येथून सुरु होवून नालासोपारा पूर्व-वर्तक टॉवर- नालासोपारा पश्चिम मार्गे-चक्रेश्वर तलाव व तेथून बोळींज मार्गे या शाळेत जाणार आहे. तसेच पून्हा शाळा सुटल्यानंतर देखील याच मार्गाने विद्यार्थ्यांना त्यांच्या स्टॉप पर्यंत नेणार आहे. या सेवेमुळे या विद्यार्थ्यांचा पालक वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

सदर बस सेवेचा शुभारंभ आमदार क्षितीज ठाकूर यांच्या हस्ते बसला हिरवा झेंडा दाखवून महापौर प्रविणा ठाकूर यांच्या उपस्थीतीत करण्यात आला. या प्रसंगी परिवहन समितीचे सभापती भरत गुप्ता नगरसेवक सखाराम महाडीक, हार्दीक राऊत, ज्योती राऊत,अतुळ साळुंख, परिवहनचे संचालक मनोहर सकपाळ त्यांचे कर्मचारी शाळेचे संचालक दत्तात्रय नाईक, डॉ.मणकेकर, शाळेचे प्राचार्य श्री.कल्याणपूर, परिवहन सदस्य हबीब पटेल,तसेच विदयर्थी व त्यांचे पालक हजर होते.






**अपंगांसाठी बस सेवा सुरु करताना मा. आ. क्षितीज ठाकूर व मा. महापौर प्रविणा ठाकूर व इतर मान्यवर**

## वृक्ष लागवड कार्यक्रम दिनांक : ३ जुलै २०१५ रोजी विरार चंदनसार, आर.टी.ओ. कार्यालय परिसरात पार पडला.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या 6 व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्ष लागवड कार्यक्रम दिनांक. 3 जुलै 2015 रोजी विरार चंदनसार,आर.टी.ओ. कार्यालय परिसरात पार पडला.

महापालिकेच्या धुकटन येथील नर्सरीत पालिकेने पाच वर्षामध्ये 7 लक्ष रोपांची निर्मिती केली त्यामधुन 3 लक्ष 45 हजार रोपांची लागवड महापालिकेने याआधीच वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच, महापालिका क्षेत्रात आता पर्यंत केली आहे.

महापालिकेच्या धुकटन येथील नर्सरीमध्ये 26 प्रकारची विविध प्रकारची रोपे आहेत.यामध्ये काजू, आंबा, जांभूळ, करंज, कडुनिंब, सीताअशोक, सीताफळ, रीठा, कपोक, शिवन, कुडा, बांबु, खजुर, थोरली गुंज, जास्वंद, मोह,बोगनवेल, कवठ, आपटा, नेवर, बकुळ, अकुरा, शिसम, हिरडा, रायन अशी विविध प्रकारची रोपे आहेत.

प्रत्येक व्यक्तीने संकल्प करावा की, आपल्या हद्दीत स्वत एक झाड लावावे,असे महापौर प्रविणा ठाकूर यांनी यावेळी बोलतांना सांगितले. महापालिकेने वृक्ष लागवड करण्यासाठी एजन्सीची नेमणूक केली असून झाडे लावणे व त्याचे संगोपन करणे हे त्या एजन्सीने करावयाचे आहे. असे महापौर यांनी समजवून दिले. परंतू आपण नागरीकांनी देखील आपल्या हद्दीत असलेल्या झाडांवर लक्ष देणे व त्या बाबतीत महापालिकेला अवगत करणे आपले कर्तव्य आहे.

येत्या वर्षात उर्वरीत सर्व रोपे महापालिका हद्दीत लागवड करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. यावळी सुमारे 250 विविध रोपांची चंदनसार परिसरात लावण्यांत आली. सदर कार्यक्रमावेळी महापौर प्रविणा ठाकूर,उपमहापौर उमेश नाईक, प्रथम महापौर राजीव पाटील, नारायण मानकर, माजी आमदार डॉमनिक घोन्साल्वीस,काशीनाथ पाटील,सुदेश चौधरी,प्रशांत राऊत, हार्दीक राऊत, आयुक्त गोविंद राठोड, उपआयुक्त शेख, उपआयुक्त संगिता धायगुडे, माजी उपमहापौर रुपेश जाधव, आदी आजी माजी नगरसेवक उपस्थीत होते.



**वृक्ष लागवड करताना मा. महापौर प्रविणा ठाकूर व मा. उपमहापौर श्री उमेश नाईक आणि इतर मान्यवर**

## वसई-विरारच्या प्रथम महिला महापौरांचा होणार अमेरिकेत सत्कार

वसई-विरारच्या प्रथम महिला महापौर प्रविणा हितेंद्र ठाकूर यांचा न्यू जर्सी अमेरिका येथे असोसिएंशन ऑफ इंडियन इन नॉर्थ अमेरिका या संस्थेतर्फे केलेल्या 'चलो गुजरात' या जागतिक गुजराती कॉन्फरंसमध्ये सत्कार करण्यात येणार आहे. याच ठिकाणी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही सत्कार करण्यात आला होता. महिला महापौरांचा अमेरिकेत सत्कार होणारी हि भारतातील पहिलीच घटना असावी. न्यू जर्सी अमेरिका येथे ३१ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान असोसिएंशन ऑफ इंडियन इन नॉर्थ अमेरिका या संस्थेतर्फे 'चलो गुजरात' हा जागतिक गुजराती कॉन्फरन्सचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात मा. महापौर यांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाला तेथील महापौरही उपस्थीत राहणार आहेत.